Estd.1962
NAAC 'A++' Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक कं. 3

**विषयः शैक्षणिक वर्ष 2020–21 मधील मार्च/एप्रिल, 2021 उन्हाळी सत्रातील डिप्लोमा / पी. जी. डिप्लोमा / सर्टिफिकेट कोर्स अभ्यासक्रमाच्या परीक्षेच्या नियोजनाबाबत.**

शैक्षणिक वर्ष 2020–21 मधील मार्च/एप्रिल, 2021 उन्हाळी सत्रातील सर्व परीक्षा दि. 10 ऑगस्ट, 2021 पासून आयोजित करण्यात येत आहेत. विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार डिप्लोमा / पी. जी. डिप्लोमा / सर्टिफिकेट कोर्स इत्यादी सर्व अभ्यासक्रमाच्या सर्व सत्रांच्या परीक्षा कोविड–19 च्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर Online पध्दतीने महाविद्यालय/अधिविभाग स्तरावर आयोजित करण्याबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

1. डिप्लोमा / पी. जी. डिप्लोमा / सर्टिफिकेट कोर्स इत्यादी अभ्यासक्रमाच्या सर्व सत्राच्या परीक्षा दि. 10 ऑगस्ट, 2021 ते दि. 30 ऑगस्ट, 2021 या कालावधीमध्ये महाविद्यालय/अधिविभाग स्तरावर Online पध्दतीने आयोजित करण्यात याव्यात.

2. विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार सर्व अभ्यासक्रमाच्या सर्व सत्राच्या परीक्षा प्रचलित Online स्वरूपात 50 गुणांची (प्रश्नपत्रिकमध्ये एकूण 25 प्रश्न प्रत्येकी 02 गुणांचे असावेत), 1 तास कालावधीची, बहुपर्यायी प्रश्नावली (MCQ) पध्दतीने घेणेत यावी.

3. सदर परीक्षेसाठी ज्या त्या अभ्यासमंडळाने निश्चित केलेल्या अभ्यासक्रमावर प्रश्नपत्रिका तयार करण्यात यावी. सदर अभ्यासक्रमासाठी अभ्यासमंडळे विभागाने विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द केलेली परिपत्रके/पत्रे अवलोकनी घ्यावीत.

4. विद्यापीठाकडे प्राप्त होणा–या विद्यार्थ्यांच्या गुणांचे रूपातर (Conversion) आवश्यकतेप्रमाणे विद्यापीठाकडून करण्यात येणार असल्याने जे गुण विद्यार्थ्यांना प्राप्त होतील तेच गुण संगणक प्रणालीमध्ये भरणेचे आहेत. तसेच Online परीक्षा देत असतांना कोणतीही तांत्रिक अडचण उद्भवल्यास संबंधीत विद्यार्थ्यांची पुर्नपरीक्षा संबंधीत महाविद्यालय/क्लस्टर मार्फत तात्काळ घेण्यात यावी. विद्यार्थ्यांच्या परीक्षेबाबत/गुणाबाबत कोणतीही तक्रार विद्यापीठाकडे येणार नाही याची दक्षता घ्यावी.

5. सदर परीक्षेचे कार्यवलन/संचलन/पर्यवेक्षण इत्यादी व परीक्षेच्या अनुषंगाने करावयाची संपूर्ण कार्यवाही संबंधीत महाविद्यालयाचे प्राचार्य/संचालक/अधिविभागप्रमुख यांचे मार्फत करणेची आहे.

6. कोव्हीड-- 19 च्या प्रादुर्भावाबाबत वेळोवेळी शासन/स्थानिक प्रशासन/युजीसी यांनी दिलेल्या निर्देशांचे पालन करण्यात यावे.

(गजानन पळसे)
प्र. संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

संदर्भ क्र. शिवाजी वि./परीक्षक नियुक्ती/आरव्हीसी/ 603
दि. 3 JUL 2021
प्रतः

1. मा. अधिविभागप्रमुख/समन्वयक, विद्यापीठातील सर्व अधिविभाग
2. मा.प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था
3. मा. संचालक, दूरशिक्षण केंद्र
4. परीक्षा विभागातील सर्व प्रशासकीय विभाग
5. समन्वयक, इंटरनेट कक्ष – संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी
6. जनसंपर्क अधिकारी
7. आयटी कक्ष – संबंधीत अभ्यासक्रमाच्या परीक्षेकरीता संगणक प्रणालीतून योग्य ती सुविधा उपलब्ध करून दयावी.
8. पात्रता विभाग, पी.जी. प्रवेश विभाग – माहितीस्तव